वाद-विवाद स्पर्धा दि. ४ व ५ फेब्रुवारी रोजी
म.स.गा. महाविद्यालय, मालेगांव कॅम्प, जि. नाशिक येथे संपन्न होत आहे

## ✻ स्पर्धेचे नियम ✻

- ✻ प्रवेशिका स्वीकारण्याचा अंतिम दिनांक २ फेब्रुवारी २०२५
- ✻ स्पर्धकाजवळ स्वत:चे ओळखपत्र असणे आवश्यक आहे.
- ✻ स्पर्धा मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, अहिराणी, अशा पाच भाषातून घेतली जाईल.
- ✻ वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या स्पर्धेत भाग घेता येईल.
- ✻ प्रत्येक महाविद्यालयास प्रत्येक भाषेसाठी दोन स्पर्धकांचा एक संघ असे जास्तीत जास्त ५ व कमीत कमी १ संघ पाठविता येतील. प्रत्येक संघातील कोणता स्पर्धक प्रस्तावाच्या बाजूने किंवा विरोधात बोलणार आहे हे प्रवेश अर्जावर स्पष्ट नमूद करणे आवश्यक आहे.
- ✻ स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या स्पर्धकाचे वय वर्ष २५ पेक्षा अधिक नसावे.
- ✻ स्पर्धकाला भाषणासाठी 'सात मिनिटे' वेळ देण्यात येईल. एका स्पर्धकाला कोणत्याही एकाच भाषेतून बोलण्याची संधी देण्यात येईल.
- ✻ प्रत्येक भाषेच्या संघासाठी प्रवेश शुल्क रु.२००/- (रु.दोनशे मात्र) डी.डी.ने प्राचार्य, म.स.गा.महाविद्यालय, मालेगांव कॅम्प, जि. नाशिक यांचे नावाने किंवा ९९७०२४२०४१ फोन-पे द्वारे (उदय टेके) यांना २ फेब्रुवारी २०२५ पूर्वी पाठवावे.
- ✻ स्पर्धकांची निवास व भोजन व्यवस्था महाविद्यालयाकडून करण्यात आलेली आहे.
- ✻ स्पर्धक विद्यार्थ्यांचा प्रवास खर्च संबंधित महाविद्यालयाने करावयाचा आहे.

## पारितोषिके

- ✻ सर्वोत्कृष्ट संघास लोकनेते व्यंकटरावजी हिरे फिरता चषक व रु.२१००१/-
- ✻ वरिष्ठ गटातील तीन सर्वोत्कृष्ट स्पर्धकांना
  प्रथम रु.५००१/-, द्वितीय रु.४५०१/- आणि तृतीय रु.४००१/- ची रोख बक्षिसे
- ✻ प्रत्येक भाषेत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या स्पर्धकास
  प्रथम रु.४००१/-, द्वितीय रु.३००१/- आणि तृतीय रु.२००१/- ची रोख बक्षिसे
- ✻ कनिष्ठ गटातील तीन सर्वोत्कृष्ट स्पर्धकांना
  प्रथम रु. ४००१/-, द्वितीय रु. ३००१/- आणि तृतीय रु. २००१/- ची रोख बक्षिसे
- ✻ प्रत्येक स्पर्धकाला सहभाग प्रमाणपत्र

### ✻ आपले विनित ✻

**मा.आ.डॉ. अपूर्व प्रशांत हिरे**
समन्वयक, महात्मा गांधी विद्यामंदिर, पंचवटी, नाशिक

**प्राचार्य डॉ.बी.एस.जगदाळे** - अध्यक्ष, महाविद्यालय विकास समिती, मसगा महाविद्यालय

**प्राचार्य डॉ. सुभाष एन. निकम**

डॉ.अनिल एस.सावळे (उपप्राचार्य)
डॉ.मनिष बी.सोनवणे (शैक्षणिक पर्यवेक्षक)
डॉ.प्रविण एस.पाटील (शैक्षणिक पर्यवेक्षक)
डॉ. कल्याण एस.कोकणे (समन्वयक IQAC)
प्रा.मिलिंद एस.कुलकर्णी (उपप्राचार्य, कनिष्ठ विभाग)
प्रा.अजिंक्य ए.ठाकरे (उपप्राचार्य, व्यवसाय शिक्षण विभाग)
प्रा.रविंद्र ए.मोरे (पर्यवेक्षक, कनिष्ठ विभाग)
श्री.राजेश एस.शिंदे (कुलसचिव)
डॉ.राजेश आर.निकम (कार्यालयीन अध्यक्ष)
श्री. जयवंत झेड. कट्यारे (कार्यालयीन अध्यक्ष)

### ✻ वाद-विवाद स्पर्धा संयोजन समिती ✻

डॉ.डी.एन.सोनवणे (प्रमुख संयोजक)

डॉ. सी.एम.निकम
डॉ.विनोद गोरवाडकर
डॉ. आर. एन निकम
डॉ.पी.एस.पवार
डॉ.एन.ए.डोखे
प्रा.दीपक सूर्यवंशी
प्रा.शशिकांत भदाणे


प्राचार्य, महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय
मालेगांव कॅम्प, जि. नाशिक (महाराष्ट्र) : ४२३१०५
प्राचार्य - ७०६६०३११५९, संयोजक : ८२०८३४७५२२
E-mail : msgcollegedebate@gmail.com


महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित,

# महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय

## मालेगांव कॅम्प, जि. नाशिक (महाराष्ट्र)

नॅक पुर्नमूल्यांकित A+ दर्जा प्राप्त महाविद्यालय

संस्थापक



कर्मवीर भाऊसाहेब हिरे

अखिल महाराष्ट्र राज्य पातळीवरील

# लोकनेते व्यंकटरावजी हिरे आंतरमहाविद्यालयीन

# वाद-विवाद स्पर्धा

## वर्ष २८वे



लोकनेते व्यंकटरावजी हिरे

## दि. ४ व ५ फेब्रुवारी, २०२५

✻ स्थळ ✻

म.स.गा. महाविद्यालय, मालेगांव-कॅम्प, जि. नाशिक

## प्रस्ताव

कृत्रिम बुद्धिमत्ता मानव जातीच्या प्रगतीसाठी वरदान आहे

कृत्रिम बुद्धिमत्ता मानव जाति की प्रगति के लिए वरदान है

Artificial Intelligence is a Boon for the Progress of Mankind

"कृत्रिम बुद्धिमत्ता" माणूस जातना भलासाठी वरदान शे

مصنوعی ذہانت بنی نوع انسان کی ترقی کے لیے ایک نعمت ہے

# लोकनेते व्यंकटरावजी हिरे राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धा

## स्पर्धा आयोजनाचा हेतू

नवमहाराष्ट्राच्या जडणघडणीत आणि नाशिक जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी ज्या मान्यवरांनी मोलाचे योगदान दिले तसेच शिक्षण, सहकार, समाजकारण, राजकारण आणि कृषि क्षेत्रात आपल्या असामान्य कर्तृत्वाचा ठसा ज्यांनी सुवर्णाक्षरांनी नोंदविला असे आमच्या महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे संवर्धक लोकनेते व्यंकटरावजी हिरे यांच्या अतुलनीय कार्याला उजाळा मिळावा, त्यांची स्मृती स्फुर्तीदायक ठरावी या हेतूने आम्ही महाविद्यालयीन युवकांसाठी राज्यस्तरीय वाद-विवाद स्पर्धेच्या माध्यमातून एक खुले व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. आर्थिक विकासाबरोबरच ग्रामीण भागातील युवक शैक्षणिक व सांस्कृतिकदृष्ट्या समृध्द व्हावा हे कै. व्यंकटरावजी हिरे यांचे स्वप्न या माध्यमातून काही अंशी साकार करण्याचा प्रयत्न आम्ही स्पर्धा आयोजनाच्या माध्यमातून करीत आहोत.

मनमाड महाविद्यालयाच्या ''रौप्य महोत्सवी'' वर्षाचे औचित्य साधून इ.स. १९९५-९६ साली ही स्पर्धा मनमाड महाविद्यालयात सुरू करण्यात आली. जिल्हास्तरावर स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असे. नंतरच्या काळात इ.स. २०१०-२०११ पासून संस्थेचे अग्रगण्य महाविद्यालय असलेल्या महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय, मालेगांव कॅम्प येथे राज्यस्तरावर या स्पर्धेचे आयोजन केले जात आहे, ही मोठी गौरवाची बाब आहे. कै. लोकनेते व्यंकटरावजी हिरे यांचे सुपुत्र व आमच्या संस्थेचे सरचिटणीस आदरणीय समाजश्री डॉ. प्रशांत व्ही. हिरे यांचे सहकार्य व मोलाचे मार्गदर्शन आम्हास नेहमीच लाभत असते.

महाविद्यालयीन उच्च शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार व्हावा, बहुजन समाजाची मुले-मुली उच्च विद्याविभूषित आणि सुसंस्कारीत व्हावीत, त्यांच्यामध्ये सामाजिक भान यावे, समाजाविषयी उत्तरदायित्व आणि जबाबदार नागरीक या नात्याने त्यांचे व्यक्तिमत्व फुलवावे हाच ध्यास मनी बाळगून लोकनेते व्यंकटराव हिरे यांनी नाशिक जिल्ह्याच्या अनेक दुर्गम भागात देखील शालेय व महाविद्यालयीन शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. अशा समाजधुरीण नेत्याच्या कर्तृत्वाचा वसा आजच्या तरुण तरुणींनी देखील घ्यावा, त्यांची स्मृती सतत तेवत रहावी हा या स्पर्धा संयोजनामागचा उदात्त हेतू आहे.

## वाद-विवाद स्पर्धेची खास वैशिष्ट्ये

१. आम्ही वादविवादासाठी निवडलेला प्रस्ताव हा नेहमीच सद्यःपरिस्थितीतील ज्वलंत प्रश्नांशी आणि ताज्या घडामोडींशी संबंधित असतो. मग तो विषय राजकीय असो, सामाजिक असो अथवा वैज्ञानिक असो, पण तो विचार प्रवर्तक असतो हे विशेष महत्त्वाचे.

२. ही स्पर्धा एकाच वेळी इंग्रजी, मराठी, अहिराणी, हिंदी आणि उर्दू अशा पाच भाषेंच्या माध्यमातून घेतली जाणारी संपूर्ण भारतातील एकमेव स्पर्धा आहे.

३. ही स्पर्धा अखिल महाराष्ट्र पातळीवरील असल्याने महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठांशी संलग्न असलेल्या कला, विज्ञान, वाणिज्य, अभियांत्रिकी, विधी, कृषी, वैद्यक आणि अन्य व्यावसायिक शिक्षण घेणारे वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी या स्पर्धेत भाग घेत असतात.

महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या युवक-युवतींची सामाजिक आणि राजकीय जाण कशा प्रकारची आहे? त्यांना सद्यःस्थितीचे कितपत ज्ञान आहे? अन्यायाविरूध्द लढा देण्याची शक्ती आणि न्यायाचा पुरस्कार करण्याची मानसिकता त्यांच्यामध्ये आहे किंवा नाही? इ. बाबींविषयी त्यांची मते कोणती आहेत? याची साधक-बाधक चर्चा करता यावी या हेतूने आम्ही यावर्षी वादविवादासाठी पुढील प्रस्ताव ठेवला आहे.

**कृत्रिम बुद्धिमत्ता मानव जातीच्या विकासासाठी वरदान आहे**

या वादविवाद स्पर्धेसाठी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या किमान एका संघाचा सहभाग नोंदवून ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे ही विनंती.

# आवाहन



## कृत्रिम बुद्धिमत्ता मानव जातीच्या प्रगतीसाठी वरदान आहे.

देशामध्ये सद्यस्थितीत सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, साहित्यिक, विज्ञान-तंत्रज्ञान अशा अनेक महत्वाच्या विषयावरील ज्वलंत स्वरूपाचे अनेक नवनविन मुद्दे आपले पारंपारिक स्वरूप बदलून तथा नवीन स्वरूप धारण करून, आपल्या समोर येत आहेत. अशा या बदलत्या सर्वांगीण परिस्थितीकडे आजच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे विशेषतः तरुणाईचे लक्ष वेधावे, त्यासंदर्भात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जागरूक करावे आणि आपल्या अवतीभोवती होत असलेल्या बदलांविषयी तरुणांना विचार करायला लावून त्यावर आजच्या तरुणाईचे अनुकूल व प्रतिकूल स्वरूपाचे वाद-प्रतिवाद व सुसंवाद घडवावे, त्यावर नवी चर्चा घडून यावी व विद्यार्थ्यांमध्ये मोठ्याप्रमाणात स्पर्धा निर्माण व्हावी, या उद्देशाने महात्मा गांधी विद्यामंदिर, पंचवटी, नाशिक-३ संस्थेच्यावतीने नेहमीच प्रयत्न केले जातात. गेली २८ वर्षे आयोजित केली जात असलेली राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धा हा त्यातीलच एक अत्यंत यशस्वी ठरलेला उपक्रम! या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून यावर्षी महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय, मालेगाव कॅम्प, जि.नाशिक यांचेवतीने कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स) मानव जातीच्या प्रगतीसाठी वरदान की शाप? या विषयावर वाद-विवाद स्पर्धा आयोजित करून सद्यस्थीतीतील एका नाविन्यपूर्ण विषयावर महाविद्यालयाने स्पर्धकांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.

वर्तमानकाळात मानव अकल्पित प्रगती करत आहे. 'कृत्रिम बुद्धिमत्ता' हा आजपर्यंतचा विज्ञान- तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा उच्चांक होय. आपण जेव्हा संगणकाच्या सहाय्याने काम करत असतो, तेव्हा आपण ज्या आज्ञा संगणकाला देतो, त्यानुसार संगणक आपले काम करते. परंतु, कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे मशीन स्वतःहून निर्णय घेते. आपल्या बुद्धिमत्तेनुसार आज्ञा तयार करते, की पुढे कोणते काम व ते कशा पद्धतीने करायचे आहे? कृत्रिम बुद्धिमत्ता हे तंत्रज्ञान पूर्णपणे मानवनिर्मित असून, मानवी बुद्धिमत्तेने तयार केलेली एक अचंबित करणारी उपलब्धी आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून आपण एखाद्या मशिनला विचार करण्याची क्षमता देऊ शकतो, हेच आजच्या विज्ञानाने दाखवून दिले आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आज आरोग्यसेवा, व्यवसाय, शिक्षण, आर्थिक व्यवस्थापन, कायदा, सुरक्षा, उद्योग/उत्पादन, दूरध्वनी, भाषण, फॅशन अशा जवळपास सर्वच क्षेत्रात होऊ लागला आहे. त्यामुळे नजीकच्या काळात तर कृत्रिम बुद्धिमत्ता ही प्रत्येक मनुष्याच्या जीवनाचा अविभाज्य घटक बनणार आहे, ह्यात कुठलीही शंका नाही. तत्राप, प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात. त्याचपद्धतीने कृत्रिम बुद्धिमत्तेस सुद्धा दुसरी बाजू असेलच, किंबहूना आहे. मग त्या बाजूचा सुद्धा विचार होणे क्रमप्राप्त ठरते, असे मला वाटते! कारण भारतासारख्या बेरोजगारी व अन्य गहन, ज्वलंत प्रश्न असणाऱ्या देशात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी तत्कालिन परिस्थितीत 'खेड्याकडे चला' असा नारा दिलाच पण जास्तीत-जास्त हातांना काम मिळावे, म्हणून चरखा हे माध्यम निवडले होते. आज कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अवतरणानंतर विविध क्षेत्रात व उद्योगांमध्ये यंत्रसामग्री आणि हुशार रोबोट्सचे आगमन झाले. त्यामुळे मानवांसाठी रोजगाराच्या संधी कमी होत आहेत, ही सुध्दा वस्तुस्थिती आहे. भारतासारख्या देशामध्ये आज रोजगार निर्मिती हे एक मोठे आव्हान आहे. त्यामुळे जास्तीत जास्त हातांना काम देत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर कशा पद्धतीने करता येऊ शकतो? यावर विचार किंबहूना व्यापक मंथन होणे तेव्हढेच गरजेचे आहे, अशी माझी धारणा आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे मानवी सृजनात्मकतेसमोर जी आव्हाने आहेत, यावर आजच्या महाविद्यालयीन तरुणाईने वैचारिक उहापोह करण्याची आवश्यकता आहे. 'ए.आय.' विषयी समाजमनात सजगता व जागृकता निर्माण व्हावी, यादृष्टीने वरील विषय यंदाच्या वाद-विवाद स्पर्धेसाठी आम्ही निश्चित केलेला आहे.

तरी 'ए.आय.' या नवकल्पनेमुळे नव्या युगाची नांदी झाली का? जुने संगणक तंत्रज्ञान इतिहास जमा झाले का? 'ए.आय.' सर्वच क्षेत्रात अचूक ठरेल का? असे अनेक प्रश्नही समोर उभे ठाकले आहेत, यावर देखील विस्ताराने चर्चा होणे आवश्यक आहे. DALL - E सारख्या इमेज जनरेटर सॉफ्टवेअरमुळे निर्माण झालेले चित्र, फोटोग्राफीची झालेली 'प्रॉम्प्टोग्राफी' यावर गांभिर्यपूर्वक विचार झाला पाहिजे. मानवाने प्रॉम्प्ट केल्याशिवाय ए.आय. देखील काम करणार नाही. म्हणून हे केवळ एक मानवनिर्मित व मानवी 'आज्ञा' वर काम करणारे साधन आहे का? असा प्रश्न मनात येतो. शेवटी ए.आय.ला आज्ञा देतांना मानवामध्ये सृजनशीलता हवीच. आजच्या संगणक युगातील तरूण मित्र-मैत्रिणींना माझे अवाहन आहे की, ''स्पर्धेसाठी निश्चित केलेल्या विषयावर सखोल, सर्वांगीण, अर्थपूर्ण व वस्तूनिष्ठ विवेचन करावे. केवळ वक्तृत्वपर, भाषिक फुलोऱ्यावर, भावनेच्या आधारावर व वादासाठी म्हणून चर्चेवर विसंबून न राहता, या विषयाची सर्व बाजूने, वस्तुनिष्ठ, आत्मविश्वासपूर्वक व निर्भीडपणे चर्चा करावी.'' हा उभय स्वरूपाचा संवाद विचारांना चालना देणारा नक्कीच ठरेल, अशी मला मनस्वी खात्री आहे. सर्वांना वाद-संवादासाठी हार्दिक शुभेच्छा ! धन्यवाद !

आपला शुभचिंतक
डॉ. प्रशांत व्ही. हिरे